दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १७२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१६ सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# विकास कामांना आमचा नेहमीच पाठिंबा, मात्र शेतकऱ्यांना डावलू नका : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**रोहिंजण येथे २४ मीटर रुंदीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण, गटार बांधणे आणि तलावावर पुलाचे बांधकाम करणे या कामांकरिता 'ठाकूर इन्फ्रा' या कंपनीला ठेका देण्यास स्थायी समितीने गेल्या गुरुवारी मंजुरी दिली. त्यावेळी चर्चेदरम्यान परेश ठाकूर यांनी तटस्थ राहण्याची भूमिका घेतल्याची नोंद करण्यात आली. यावेळी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी त्याना यावर बोला असे सांगितले. मात्र ते तटस्थ राहिले. बाकीचे विषय मंजूर करत तेव्हा तुम्ही लगेच बोलता मात्र याविषयी तुम्ही तटस्थ भूमिका काय घेता त्यामुळे तुमचा नक्की कशाला विरोध आहे असे प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले. याचा खुलासा परेश ठाकूर यांनी केला नाही. त्यामुळे येथे रस्त्याचा विषय घेऊ नका असे प्रीतम म्हात्रे यांनी सुचवले. याबबातची माहिती आयोजित पत्रकार परिषदेत विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी पत्रकारांना दिली. यावेळी नगरसेवक गणेश कडु, अरविंद म्हात्रे, सतीश पाटिल, रवीन्द्र भगत उपस्थित होते.**



दोन दिवसापूर्वी कळंबोली, तळोजा, नावडे, धानसर, रोहिंजण आदी पट्ट्यातील अनेक विषय मंजूर करून घेण्यात आले आहेत. परंतु या विषयाचा पाठपुरावा महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी केलेला आहे. आता फक्त हे विषय मंजूर करून घेवून नारळ फोडण्याचे काम सत्ताधारी करणार आहेत. जनता सुज्ञ असून महाविकास आघाडीचे काम त्यांच्या समोर असल्याने जनतेला सामोरे कसे जायचे? त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी हे विषय मंजूर करून घेतल्याचे मत विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी व्यक्त केले आहे. गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत ४६ विषय मांडण्यात आले. त्यापैकी ४४ विषयांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये मलनिस्सारण वाहिन्या, अंतर्गत गटारे, मासळी बाजार, रस्ते काँक्रीटीकरण, डांबरीकरण अशा स्वरूपांच्या जवळपास ६५ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी दिली. ठाकूर इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा. लि. या कंपनीलाच रोहिंजण येथील रस्त्याच्या कामासाठी २४ कोटी ५४ लाख रुपयांचे कंत्राट देण्याचा निर्णय घेण्यात आला. नऊ तारखेला जी सभा झाली त्यात ४६ विषय झाले त्यात काही विषय वगळता सर्वच विषयांना मंजुरी देण्यात आली. हे विषय पास झाले आहेत त्यातील ७० टक्के विषय महविकास आघडीचे नगरसेवक निवडून आले आहेत त्यांच्या प्रभागातील आहेत. त्याचा पाठपुरावा महा विकास आघाडीचे नगरसेवक गेली साडेचार वर्षे करत आहेत त्यामुळे विकास कामांना आमचा कधीही विरोध नाही. असे प्रितम म्हात्रे यानी स्पष्ट केले. टेंडर प्रक्रियेला आम्ही विरोध करत नाही. ज्या ठिकाणी रस्त्याचे काम होणार आहे त्या ठिकाणी अद्याप ही रेसिडेंशल एरिया झालेली नाही त्यामुळे २५ कोटीचा खर्च कशासाठी? असा सवाल विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी विचारला. हेच पैसे आपण कोविड काळात वापरू शकतो. तिसरी लाट येऊ घातली आहे त्यासाठी हे पैसे खर्च करावेत अशी मागणी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी केली. डेल्टा व्हेरीइंट जोरात येऊ पाहत आहे त्यासाठी हे पैसे खर्च करावेत असेही त्यांनी सुचवले.

रोहिंजण येथे जे काम सुरू होणार आहे त्या ठिकाणी शेतकऱ्यांची अडचण आहे. १४ ते १५ शेतकऱ्यांची अडचण आहे यातील काही शेतकरी कोर्टात देखील गेलेले आहेत. त्यामुळे येथे रस्त्याचा अट्टहास कशासाठी करतात असा सवाल विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी उपस्थित केला. महाविकास आघाडीचा विकास कामांना कधीही विरोध नाही. मात्र येथील शेतकऱ्यांना डावलु नका असे म्हात्रे यानी सांगितले. साडेचार वर्षात विरोधी पक्षनेते असताना कधीही कॉन्ट्रॅक्ट मिळवलं नाही घेतलं नाही असं ठणकावून प्रितम म्हात्रे यांनी सांगितलं. विरोधी पक्ष नेते आणि नगरसेवक हे जनतेने आम्हाला जनतेची कामं करण्यासाठी निवडून दिले असल्याचे म्हात्रे यांनी सांगितले. ज्या ठिकाणी चुकीचं काम होत असेल त्याठिकाणी विरोधी पक्ष नेहमीच विरोधाची भूमिका घेईल.

विकास कामांना विरोध करणे म्हणजे विरोधी पक्षाचे काम आहे असे नाही. करामध्ये तीस टक्के सवलत मिळाली हे केवळ महा विकास आघाडीमुळेच मिळाली आहे आम्ही विरोध केला त्यामुळे पालिकेला ३० टक्के सवलत द्यायला भाग पाडले. यातही आम्ही खुश नाही आम्हाला पन्नास टक्के सवलत हवी आहे यासाठी आमचे प्रयत्न सुरू असल्याचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले. त्यासाठी नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या सोबत याबाबत बोलणी सुरू असल्याचे म्हात्रे यांनी सांगितले. चुकीच्या पद्धतीने लावलेला टॅक्सला आमचा विरोध कायम आहे.

साडेचार वर्षाच्या कारकिर्दीत पालिकेने ४६ विषय कधी घेतले नाहीत. ते आत्ता घेतले मात्र २४ कोटी रुपयांच्या रस्त्यांच्या कामाचे टेंडर आहे याविषयी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करणार आहोत. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या समोर येथील शौचालयाचे बांधकाम तोडण्याला देखील महाविकास आघाडीचा ठाम विरोध आहे असे सांगण्यात आले. तर नगरसेवक गणेश कडु यांनी शौचालय साफ करण्यामध्ये भ्रष्टाचार झाले असल्याचा आरोप केला.

# ओबीसी आरक्षणासाठी राज्य सरकार अध्यादेश काढणार ; मंत्रिमंडळाचा निर्णय

## अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची माहिती

**दै.रायगड नगरी । मुंबई**



ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या मुद्द्यावर महाविकास आघाडी सरकारला विरोधी पक्षाला घेरलेले असतानाच मोठे पाऊल उचलत आघाडी सरकारने ओबीसी आरक्षणासाठी अध्यादेश काढण्याचा निर्णय घेतला आहे. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. आंध्र प्रदेश, तेलंगणा सरकारने ज्या पद्धतीने आरक्षणाचे अध्यादेश काढले आहेत, त्याच धर्तीवर हा अध्यादेश काढला जाणार आहे. ही माहिती राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.

या अध्यादेशाद्वारे देण्यात येणारे आरक्षण ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडणारे नसेल असेही भुजबळ म्हणाले. सरकारच्या या निर्णयानंतर ओबीसींच्या १० ते १२ टक्के जागा कमी होऊ शकतात. मात्र असे असले तरी राज्य उचलत असलेल्या या पावलामुळे ओबीसी समाजाच्या ९० टक्के जागमा वाचणार आहेत, असेही भुजबळ म्हणाले. या अध्यादेशाविरोधात कोणीही कोर्टात गेले तरी तो कोर्टात टिकेल असाच अध्यादेश असेल, असेही भुजबळ म्हणाले.

आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ओबीसी आरक्षणावर सविस्तर चर्चा करण्या आली. त्यानंतर आंध्र प्रदेश आणि तेलंगण राज्याने आरक्षणाबाबत काढलेल्या अध्यादेशांच्या धर्तीवर हे अध्यादेश काढण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यात महत्वाचे म्हणजे या अध्यादेशानंतर ओबीसींच्या १० ते १२ टक्के जागा कमी होणार आहेत. मात्र संपूर्ण आरक्षण अडचणीत येण्यापेक्षा ९० टक्के जागा वाचवणे केव्हाही चांगले, असा विचार करून राज्य सरकारने हा अध्यादेश काढण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या जागा कमी होणार आहेत, त्या कशा मिळवता येतील याबाबत कोणते पर्याय उपलब्ध आहेत याची चाचपणी करण्यात येणार असल्याचे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील ५ जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकीसाठीचे मतदान ५ ऑक्टोबर रोजी घेण्याचे जाहीर केले आहे. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सुटलेला नसल्याने या निवडणुकांमध्ये ओबीसी समाज आरक्षणाला मुकणार होता. यावर मार्ग काढण्याच्या उद्देशानेच राज्य सरकारने हा अध्यादेश काढण्याचा निर्णय घेतला आहे.

## श्रीवर्धन तालुक्यातील पुनिर गावामध्ये

# महावितरणच्या विजेचा शॉक लागून सहा दुभत्या म्हशी मृत्यूमुखी

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन** : श्रीवर्धन तालुक्यातील पुनिर गावाचे हद्दीमध्ये एका शेतकऱ्याच्या सहा म्हशींचा मृत्यू महावितरणचा शॉक लागून झाला आहे. सहा म्हशीं पैकी चार म्हशी दूभत्या होत्या.

पुनिर गावातील शेतकरी लियाकत इस्माईल पठाण यांच्या मालकीच्या या म्हशी होत्या. म्हशी चरून गुरांच्या गोठ्याकडे येत असताना महावितरणची विजेची तार जमिनीवर पडलेली असल्यामुळे म्हशींचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.सदर घटना १२ सप्टेंबर रोजी घडली आहे.अकबर परदेशी यांच्या जागेत ही घटना घडली आहे.

म्हशीं सोबत असलेला गुराखी त्याच्या पायाला देखील मुंग्या आल्यासारखे जाणवल्यामुळे मागे पळून गेल्याने त्याचे प्राण वाचले आहेत. अन्यथा त्या ठिकाणी जीवितहानी होण्याचा धोका होता. सदर मृत पावलेल्या म्हशींची बाजारभावाप्रमाणे किंमत अंदाजे सहा लाख सत्तर हजार रुपये होती. म्हशींचा मृत्यू झाल्यामुळे लियाकत पठाण यांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. लियाकत पठाण यांनी याबाबत श्रीवर्धन पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर श्रीवर्धन पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे.

त्याचप्रमाणे तलाठी सजा चिखलप यांनी देखील त्याठिकाणी जाऊन पंचनामा केलेला आहे.महावितरणच्या गलथान करभारा बाबत नागरिकांमधुन संताप व्यक्त होत आहे. सदर शेतकऱ्याच्या म्हशी मृत झाल्यामुळे त्याचा रोजगार धंदा पूर्णपणे बंद झालेला आहे. तरी महावितरणने व शासनाकडून सदर शेतकऱ्याला तातडीने मदत मिळावी अशी मागणी होत आहे.

## संक्षिप्त...

### अभिनेता सोनू सूद आयकर विभागाच्या रडारवर




**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

बॉलिवूड अभिनेता सोनू सूद(डेर्पी डेव) च्या घरी आयकर विभागाची पडताळणी सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, यावेळी आयकर विभागाचे मोठे अधिकारी सोनू सूदच्या घरी उपस्थित आहेत. मुंबईतील सोनू सूदच्या एकूण ६ जागांवर आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांची(खपलेश ढ्र) पाहणी सुरू आहे. विशेष म्हणजे दिल्ली सरकारने अलीकडेच सोनू सूदला मेंटरशिप कार्यक्रमाचं ब्रँड म्बेसेडर बनवलं होतं. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

लॉकडाऊन दरम्यान लाखो लोकांना घरी पोहचण्यासाठी सोनू सूदनं मदत केली होती. तेव्हापासून गरिबांसाठी सोनू सूद हा रिअल लाईफ हिरो ठरला होता. पहिल्या लॉकडाऊनपासून आतापर्यंत सोनू सूदने अनेक लोकांची मदत केली आहे. अभिनेता सोनू सूदच्या सोशल मीडियावर जर कोणी मदतीसाठी विनंती केली तर तात्काळ सोनू सूदकडून त्या मेसेजची दखल घेतली जाते. कोरोनाच्या काळात अभिनेता सोनू सूदच्या लोकप्रियतेत प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचं दिसून आलं.

# धारावीत खळबळ, एक चरसी बनला दहशतवादी

## सुरक्षेसाठी जानचे कुटुंब पोलिसांच्या देखरेखीखाली

**दै.रायगड नगरी । मुंबई**



दिल्ली आणि मुंबईसह आणखी काही भागांत स्फोट व दहशतवादी कारवाया करण्याचा पाकिस्तान समर्थक दहशतवाद्यांचा कट दिल्ली पोलिसांनी उधळून लावला. दिल्ली पोलिसांनी काल ६ दहशतवाद्यांना अटक केली. अटक केलेल्या संशयित दहशतवाद्यांपैकी एकमुंबईच्या सायन परिसरातील धारावीचा रहिवासी आहे. समीर कालिया उर्फ जान मोहम्मद शेख (४७) असं या धारावीतील संशयित दहशतवाद्याचं नाव आहे. काल त्याच्या नावाची चर्चा सुरु झाल्यानंतर धारावीतील गल्लीबोळ्यात एकच खळबळ माजली आहे. जानला अमली पदार्थाचे व्यसन असल्याची देखील चर्चा असून एक चरसी दहशतवादी बनल्याच्या चर्चेला उधाण आले आहे.

.../२

# ओबीसी समाजाचा विश्वासघात करणाऱ्या ठाकरे सरकारचा निषेध

**दै.रायगड नगरी । पनवेल**



महाविकास आघाडी ठाकरे सरकारने ओबीसींच्या राजकीय आरक्षणाबाबत नेहमीच उदासिनता दाखवली आणि समाजाचा नेहमीच विश्वासघात केला. त्यामुळे ओबीसी समाजाला न्यायापासून वंचित ठेवणाऱ्या तिघाडी ठाकरे सरकारच्या विरोधात पनवेलमध्ये जोरदार निदर्शने करण्यात आली.

ओबीसी समाजाचा विश्वासघात करून ओबीसी आरक्षण घालविणाऱ्या आघाडी सरकारच्या विरोधात भारतीय जनता पार्टी तर्फे आज (बुधवारी, दि. १५ सप्टेंबर) भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनखाली राज्य सरकार विरोधात निषेध आंदोलन करण्यात आले.

पनवेल तालुका व शहर भाजप कार्यालयाजवळ झालेल्या या आंदोलनात भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत,

> सर्व स्तरावर ठाकरे सरकार अपयशी ठरले आहे. वसुली शिवाय या राज्य सरकारला काहीही दिसत नाही त्यामुळे सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे सातत्याने ठाकरे सरकार दुर्लक्ष करीत आहे.
>
> **- मनोज भुजबळ,**
> **प्रदेश उपाध्यक्ष- ओबीसी सेल**

शहराध्यक्ष जयंत पगडे, महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष मनोज भुजबळ, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत घरत, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, कामोठे तालुका मंडल अध्यक्ष रविंद्र जोशी, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस राजेश गायकर, कर्जत मंडल

.../२

# विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी जाहीर माफी मागावी

## पालीत राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीकडून निषेध

**दै.रायगड नगरी । धम्मशील सावंत**



**पाली/बेणसे** : विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याचा आरोप करीत पाली सुधागड सह जिल्ह्यात राष्ट्रवादी महिला आघाडीतर्फे बुधवारी दि.(१५)रोजी निषेध दर्शविण्यात आला. विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी समस्त महिला वर्गाची माफी मागावी अशी मागणी संतप्त महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्षा गीताताई पालरेचा म्हणाल्या की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष रुपालीताई चाकणकर यांच्या नेतृत्वाखाली तसेच पालकमंत्री आदिती ताई तटकरे व रायगड जिल्हा निरीक्षक रुपाली ताई दाभाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांचा सर्वत्र निषेध दर्शविला जात आहे. शिवराय, फुले, शाहू, आंबेडकरांचा हा महाराष्ट्र आहे, थोर साधू संतांची ही भूमी आहे, मासाहेब जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचा उज्वल वारसा आम्हाला लाभला आहे. प्रवीण दरेकर यांना महिलांचा सन्मान राखता येत नसेल तर त्यांनी अपमान देखील करू नये, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नेहमीच महिलांचा सन्मान केला आहे. जिल्ह्यात खा.सुनिल तटकरे यांच्या कणखर नेतृत्वात महिलांना

.../२

# चक्रीवादळांच्या तडाख्याचा कायमस्वरूपी बंदोबस्त करणार

## ३ हजार कोटींची घोषणा; ठाकरे सरकारचा निर्णय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

तौत्के, निसर्ग चक्रीवादळांनी राज्याच्या पश्चिम किनारपट्टीवर केलेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे सरकारनं आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आगामी काळात चक्रीवादळांचा धोका लक्षात घेता वादळांमुळे निर्माण होणाऱ्या संकटांवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी राज्य सरकारनं ३ हजार कोटींची घोषणा केली आहे. या निधीच्या मदतीनं पालघर, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड जिल्ह्यांमध्ये पूरस्थितीशी सामना करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत.

अतिवृष्टी आणि चक्रीवादळांच्या तडाख्यामुळे राज्याला मोठं नुकसानीला सामोरं जावं लागत आहे. अनेकांचे प्राण जातात, तर आर्थिक नुकसानही बरंच होत आहे. नैसर्गिक आपत्तीचं प्रमाण वाढल्यामुळे कोकवासीय देखील हैराण झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याआधीही कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासंदर्भातील सूतोवाच केलं होतं. त्याच दृष्टीकोनातून आता कायमस्वरुपी उपाययोजनांसाठी सरकार प्रयत्नशील आहे.

# उधळलेला उडता घोडा

'पेगासस' पाळत प्रकरणात केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात घेतलेली भूमिका बोटचेपी आणि तोंडफिरवी आहे. सर्वोच्च न्यायालयाने सरकारला 'उगाच इकडच्या तिकडच्या बाता मारू नका,' अशा शब्दांत जे खडसावले, ते ताडन सरकारने ओढवून घेतले आहे. सरकारने चौकशी समिती नेमण्याची तयारी दाखविली, पण खंडपीठासमोर सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे टाळले. त्यावर, सरन्यायाधीश रमण यांनी 'सरकार हे काय करते आहे; ते आम्हाला समजते,' असेही फटकारले. 'पेगासस' हे इस्रायली सॉफ्टवेअर आहे. 'पेगासस' हा ग्रीक पुराणकथांमधला पाठीवर पंख असणारा उडता घोडा आहे. मुळात घोडा शक्तिमान. त्याला पंख मिळाल्यावर त्याची शक्ती व गती किती वाढेल, याची कल्पनाच केलेली बरी. पुराणातली ही काल्पनिक शक्ती 'पेगासस' या पाळत-आज्ञावलीत इतकी प्रत्यक्षात उतरली आहे की, ती फोनमध्ये घुसते तेव्हा लिंक किंवा मेसेज उघडावाही लागत नाही. शिवाय, फोनसंवाद, संदेश, ईमेल, पासवर्ड असे चोरून झाले किंवा पाळतीचे काम संपले की, स्वतःची अवतारसमाप्ती करण्याची अद्भुत क्षमता पेगाससमध्ये आहे. दहा देशांमधल्या १६ माध्यम संस्थांनी उजेडात आणलेले हे प्रकरण संसदेत विरोधकांनी मांडले, तेव्हा सरकारने त्याला बिलकुल दाद दिली नव्हती. आता 'राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा' महत्त्वाचे असल्याचे सांगत सरकार सर्वोच्च न्यायालयात सविस्तर माहिती देण्याचे टाळते आहे. केंद्र सरकारला यात संसद, समाज आणि सर्वोच्च न्यायालय या साऱ्यांपासून काय लपवायचे आहे? तसे नसेल तर सरकारने प्रतिज्ञापत्र सादर करावे. पळपुटेपणा करू नये. यात ज्यांच्यावर नजर ठेवल्याचा आरोप आहे, त्यात सर्व क्षेत्रांमधली नावे आहेत. नेते, नोकरशहा, पत्रकार त्यात आहेत. मात्र, हे आरोप जर खरे नसतील तर सरकारने चौकशी का टाळावी? याचिकांच्या सुनावणीत राष्ट्रीय सुरक्षेला धक्का पोहोचविणारी माहिती उघड होण्याची भीती असेल तर 'इन कॅमेरा' सुनावणी घेता येईल. मात्र, 'आम्ही प्रतिज्ञापत्रच देणार नाही' हा असहकार कशासाठी? सरकारची बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी 'शत्रू किंवा घरभेद्यांच्या हालचाली किंवा संभाषण टिपले गेले असेल तर, ते उघड होणे, राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने योग्य नाही,' असा युक्तिवाद केला. तो योग्य आहे आणि इतका महत्त्वाचा मुद्दा न्यायमूर्तींना कळत असणारच. मात्र, सरकारला राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा पुढे करून लपवाछपवी करता येणार नाही. भारतातील अनेक नेते किंवा पत्रकार यांच्यावर पाळत ठेवली असेल तर तेही राष्ट्रीय सुरक्षेला धोका आहेत का, या प्रश्नाचे उत्तर सरकारने द्यायला हवे. ते उत्तर सरकारने सर्वोच्च न्यायालयात द्यावे किंवा पाळत ठेवल्याचे आरोपच निखालस असत्य आहेत, असे तरी प्रतिज्ञापूर्वक सांगावे. सरकारने ही भूमिका मांडली तर ज्यांनी या प्रकरणात याचिका दाखला केल्या आहेत; त्यांच्यावरच आरोप सिद्ध करण्याची जबाबदारी येईल आणि काय ते सत्य एकदाचे साऱ्या देशाला समजेल. पहिल्यांदा हे आरोप झाले तेव्हा 'पेगासस' कंपनीने 'आम्ही ही आज्ञावली कोणत्याही खासगी व्यक्ती किंवा संस्थेला विकत नाही. ती केवळ देशांच्या केंद्रीय सरकारांनाच विकतो,' असा खुलासा केला होता. याचा अर्थ, भारतात समजा शेकडो जणांवर पेगाससचे साह्य घेऊन पाळत ठेवली असेल तर तसा आदेश कोणत्यातरी सरकारी यंत्रणेलाच द्यावा लागेल. राष्ट्रीय सुरक्षेसाठी कोणाला पाळतपात्र मानायचे आणि कोणाला नाही, हा या यंत्रणांचा स्वेच्छाधिकार असणार. मात्र, एखादा नागरिक हा 'राष्ट्रीय सुरक्षेला धोका' आहे, असे मानणे आणि त्यासाठी पाळत ठेवण्याची मुभा सरकारनेच स्वतःच स्वतःला देणे, यात त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याची तर पायमल्ली आहेच; पण त्याच्या राष्ट्रप्रेमाचाही अधिक्षेप आहे. संशयाची सुई अशी कोणावरही रोखून त्याच्या खासगी आयुष्यात बिनदिक्कत घुसण्याचा अधिकार कोणत्याही सरकारला नाही. असता कामा नये. सर्वोच्च न्यायालयाने 'तुम्ही प्रतिज्ञापत्र सादर केले नाहीत तर आम्हाला हवा तो आदेश आम्ही देऊच,' असा इशारा दिला आहे. अर्थात, उद्या सर्वोच्च न्यायालयाने चौकशी समिती किंवा आयोग नेमला तरी राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करून कोणती माहिती किंवा तपशील गुप्त ठेवायचा, याचा निर्णय शेवटी केंद्रीय गृहखातेच करणार आहे. यातला खरा मुद्दा कायदेकानू, न्यायालयीन चौकशा किंवा न्यायव्यवस्था व सरकार यांच्या अधिकारांचा संघर्ष असा नसून सत्ताधाऱ्यांनी लोकशाही मूल्यांवर श्रद्धा ठेवून त्यांचे प्रामाणिक पालन करण्याचा आहे. केंद्र सरकारला त्यांचीच पत्रास नसेल तर या उधळलेल्या उडत्या घोड्याला लगाम कोण घालणार?



घाटकोपर, मुंबई येथील कल्पेश माळी यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराय



पनवेल येथील मधुकर रिकामे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराज

पृष्ठ क्र.१ वरुन...

## धारावीत खळबळ, एक चरसी बनला दहशतवादी

जानला राजस्थानच्या कोटामधून ताब्यात घेण्यात आलं असून तो सायन पश्चिमेकडील एमजी रोडवर असणाऱ्या कालाबखर परिसरात राहतो. जान मोहम्मद शेखच्या कुटुंबीयांनाही पोलिसांनी चौकशीसाठी धारावी पोलीस ठाण्यात आणलं. त्यावेळी धारावी पोलीस ठाण्याबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच जानच्या कुटुंबाच्या सुरक्षेसाठी कुटुंबियांना पोलिसांनी आपल्या देखरेखीखाली ठेवलं असल्याची माहित मिळत आहेत. तसेच जानला उत्तर प्रदेशला जाण्यासाठी तिकीट देणाऱ्या मोहम्मद अजगर शेख या एजन्टला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

त्याचप्रमाणे समीर कालिया उर्फ जान मोहम्मद शेख याने गणपती विसर्जनासाठी महत्त्वाचे ठिकाण असलेल्या दक्षिण मुंबईतील गिरगाव चौपाटी, मरिन ड्राईव्ह परिसराची रेकी केली असल्याची महत्वाची माहिती उघड झाली आहे. तसेच अनेक वेळा त्याने मुंबईतील उपनगरीय रेल्वे स्थानकांची तपासणीही केली होती, अशी माहिती एटीएसच्या सूत्रांनी दिली. जान मोहम्मदला पत्नी आणि दोन मुली आहेत. मुंबई पोलिसांनी त्यांचीही धारावी पोलीस ठाण्यात बसवून चौकशी केली.

## ओबीसी समाजाचा विश्वासघात करणाऱ्या ठाकरे सरकारचा निषेध

तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, सरचिटणीस राजेश भगत, संजय कराळे, पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका राजेश्री वावेकर, वृषाली वाघमारे, चंद्रकांत घरत, आप्पा भागीत, अणेश ढवळे, अमरीश मोकल, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. आघाडी सरकारने सर्वोच्च न्यायालयात ओबीसी आरक्षणाची बाजू मांडण्यासाठी वकिलच दिला नाही, या कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आरोपावर मुख्यमंत्री ठाकरे यांनी अद्याप उत्तर दिले नाही. त्यामुळे ठाकरे सरकारच्या नाकर्तेपणाच्या भूमिकेचा यावेळी जाहीर निषेध करण्यात आला. गेले सहा महिने आघाडी सरकार ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाबाबत टोलवाटोलवी करत आहे. ओबीसी समाजाचा इम्पिरीकल डेटा गोळा करण्यासाठी तातडीने कार्यवाही सुरू करा, असे भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने राज्य सरकारला सातत्याने सांगितले आहे. मात्र आघाडी सरकारने गेल्या सहा महिन्यांत काही हालचालीच केल्या नाहीत. इम्पिरीकल डेटा गोळा करण्यासाठी नेमलेल्या मागासवर्गीय आयोगाला आघाडी सरकारने निधीही दिला नाही. या हलगर्जीचा परिणाम ओबीसी आरक्षणाशिवाय पाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. सत्ताधारी पक्षातील वजनदार गटाला पुढील वर्षी होणाऱ्या महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद निवडणुका ओबीसी समाजाला आरक्षण न देताच घ्यावयाच्या असल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात ओबीसी आरक्षणाची बाजू प्रभावीपणे मांडली नाही. राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात वकिलच उभा केला नाही. विधी व न्याय खात्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या मुख्यमंत्री ठाकरे यांनी नाना पटोले यांच्या आरोपावर खुलासा करावा, अशीही मागणी यावेळी करण्यात आली. ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका होणार नाहीत असे वारंवार सांगणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी आरक्षण टिकविण्यासाठी काहीच हालचाल केली नाही. त्यामुळे ओबीसी समाजाच्या पाठीत खंजीर खुपसला आहे, अशी घणाघाती टीकाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर झाली. ओबीसी के सन्मान मे भाजप मैदान मे, महाविकास आघाडी हाय हाय, आरक्षण आमच्या हक्काचा नाही कुणाच्या बापाचा, आघाडी सरकारचा धिक्कार असो, अशा गगनभेदी घोषणा देत जो पर्यंत ओबीसींचा राजकीय आरक्षण मान्य होत नाही तो पर्यंत निवडणुका घेऊ नये अशी जोरदार मागणी या आंदोलनातून करण्यात आली. तसेच या संदर्भात तहसिलदार यांना निवेदन देण्यात आले.

## विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी जाहीर माफी मागावी

समाजकारण व राजकारणात प्रभावीपणे काम करण्याची संधी मिळवून दिली आहे.

ज्येष्ठ व वरिष्ठ नेत्यांनी कोणतेही वक्तव्ये करताना भान राखले पाहिजे, संस्कार व संस्कृती जपण्याची नैतिक जबाबदारी प्रत्येकाची आहे, यापुढे अशी बेताल वक्तव्ये खपवून घेतली जाणार नाहीत असा इशारा जिल्हाध्यक्ष पालरेचा यांनी दिला. माजी सभापती साक्षीताई दिघे म्हणाल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष आदरणीय शरद पवार साहेबांनी आम्हाला ५० टक्के आरक्षण देऊन प्रतिष्ठा व सन्मान मिळवून दिला आहे. आज महिला विविध क्षेत्रात आघाडीवर असल्याचे दिसतात. आपण देखील मातेच्या पोटी जन्माला आलोय, आपल्या आई, बहीण, मावशी , काकी याप्रमाणे सर्वांचा आदर राखला जावा, संस्काराची दिशा नसल्याने अशा प्रकारची बेताल व चुकीची वक्तव्ये होत असल्याची भूमिका दिघे यांनी मांडली. यावेळी माजी सभापती साक्षी ताई दिघे, अस्मिता घरत, अंकिता मोरे, वैभवी साखरले, आदींनी विचार मांडले. यावेळी राष्ट्रवादी महिला रायगड जिल्हा अध्यक्षा गीताताई पालरेचा,माजी सभापती साक्षीताई दिघे, सुधागड तालुका महिला अध्यक्षा रुपाली भणगे, पाली शहर अध्यक्ष सुजाता वडके, शहर युवती अध्यक्षा अंकिता मोरे, शहर सरचिटणीस संगीता साखरले, शुभांगी कारखानीस , वंदना गायकर, अस्मिता घरत, सकिना पानसरे, रेखा साळुंके, सुनंदा देशमुख, सुजाता भोईर, सुधागड तालुका अध्यक्ष रमेश साळुंके, महंमदभाई धनसे, स्नेहल दंत, विद्या सावंत, सविता शिर्के, सुजाता खंडागळे, रुचिता बेलोसे, आदींसह महिला व पदाधिकारी उपस्थित होते.

# स्व.शामकांत नाईक यांच्या हत्येचा तपास योग्य दिशेने व्हावा : शेखर नाईक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोणतीही फौजदारी किंवा गुन्हेगारी पार्श्वभूमी नसताना माझ्या वडीलांच्या चारित्र्यावर करण्यात आलेले आरोप हे बिनबुडाचे व तथ्यहीन असून आज आमची समाजामध्ये बदनामी होत आहे. तरी या संदर्भात नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी सखोल चौकशी करून हत्येचा तपास योग्य दिशेने करावा आणि नाईक कुटुंबीयांना न्याय द्यावा, अशी मागणी स्व.शामकांत नाईक यांचे सुपुत्र शेखर शामकांत नाईक यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



या संदर्भात शेखर नाईक यांनी त्यांची बाजू मांडताना सांगितले की, काही दिवसांपूर्वी त्यांचे पिताश्री शामकांत नाईक (वय-८०) यांचा मृतदेह उलवे सेक्टर १९ येथील एका डबक्यात आढळून आला होता. याबाबत पोलिसांनी अधिक तपास करून तेथील किराणा माल दुकानदार मोहन चौधरी यांना या खुनाबाबत अटक केली. दरम्यान याकाळात हा खून मोहन चौधरी यांच्या पत्नीकडे शरीरसुखाची मागणी केल्यानेच शामकांत नाईक यांची हत्या केल्याचे आरोपी मोहन चौधरी यांनी सांगितले आहे. परंतु ८० वर्षीय वृद्ध इसम अशा प्रकारची मागणी कशी करू शकतो.? असा सवाल शेखर नाईक यांनी केला आहे. शेखर नाईक पुढे बोलताना म्हणाले की, माझे वयोवृध्द वडील हे अध्यात्मिक विचारांचे होते. तसेच माझ्या वडिलांची आतापर्यंत कोणतीही गुन्हेगारी व चारित्र्यहीन पार्श्वभूमी नाही. त्यामुळे माझ्यासह माझ्या कुटुंबाची समाजामध्ये असलेल्या प्रतिष्ठेचा भंग करण्यासाठी माझ्या वडीलांवर चुकीचे आरोप करण्यात आलेले आहेत. एकीकडे वडील गेल्याच्या दुःखाचे सावट आम्हा नाईक कुटुंबीयांवर असताना दुसरीकडे स्वर्गीय वडिलांचे चारित्र्य हनन करण्याचे प्रकार समाजमाध्यमातून सुरु आहेत. त्यामुळे आमच्या कुटुंबीयांची समाजात नाहक बदनामी होत असून संपूर्ण कुटुंब मानसिक तणावातून जात आहे. तरी नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी आम्हा नाईक कुटुंबीयांना न्याय देण्याच्या दृष्टीने या प्रकरणाचा योग्य तपास करून सत्य उजेडात आणावे, अशा मागणीचे निवेदन शेखर नाईक यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तांना दिले आहे. तसेच या निवेदनाची प्रत महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री, नवी मुंबई परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त व सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल यांना दिली आहे. त्याचप्रमाणे या गुन्ह्यासंदर्भात आमच्याकडे काही महत्त्वाची माहिती असून, त्यासंदर्भात माहिती संबंधित पोलीस ठाण्यांनाही दिली आहे.

त्यामध्ये प्रामुख्याने सीसीटीव्ही फुटेज व कॉल रेकॉर्ड यामध्ये असलेली विसंगती, संबंधित पोलीस ठाण्यात वडील हरवल्याची तक्रार नोंदविल्यानंतर पोलिसांनी स्वतः आरोपीच्या दुकानाची संपूर्ण पाहणी केली होती, मग त्यावेळी शामकांत नाईक यांचा देह त्याठिकाणी का आढळला नाही? असा सवाल सुद्धा शेखर नाईक यांनी केला आहे. त्यामुळेच सदरचा खून हा आर्थिक लाभासाठी झालेला असल्याचा संशय शेखर नाईक यांनी बोलताना व्यक्त केला आहे. या गुन्ह्यातील आरोपी मोहन चौधरी याने पोलिसांना दिलेली माहिती नक्कीच खोटी, खोडसाळ व बनाव केलेली आहे. त्यामुळे हा तपास योग्य दिशेने व्हावा व आम्हा नाईक कुटुंबीयांना न्याय द्यावा, असेही शेवटी शेखर नाईक यांनी नवी मुंबई पोलिसांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# पत्रकार संजय कदम यांचा वाढदिवस पनवेल तालुक्यातील पत्रकारांनी केला साजरा

### लोकनेते रामशेठ ठाकूर, कामगार नेते महेंद्र घरत यांनीही दिल्या शुभेच्छा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेली २५ वर्षे पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे पनवेलमधील जेष्ठ पत्रकार संजय कदम यांचा वाढदिवस पनवेल तालुक्यातील पत्रकारांनी मोठ्या उत्साहात साजरा केला.



गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकारीता क्षेत्रात संजय कदम यांचे मोठे योगदान आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी अनेक नागरी समस्या प्रशासनासमोर मांडून अन्यायाविरुद्ध वाचा फोडण्याचे काम लेखणीच्या माध्यमातून सुरूच ठेवले आहे. गुन्हे जगतातील घडामोडी आणि संजय कदम हे एक पनवेल तालुक्यातील स्वतंत्र समीकरण मानले जाते. पत्रकारीतेमधून समाजहिताच्या बातम्या लोकांपर्यंत पोहचवत असताना आजपर्यंत त्यांना अनेक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. आज (मंगळवार दि.१४ सप्टेंबर) त्यांच्या वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, रायगडचे कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, नगरसेवक राजू सोनी, युवानेते पवन सोनी, वादळव-ाराचे संपादक ज्येष्ठ पत्रकार विजय कडू, पनवेल टाइम्सचे संपादक ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, कोकण डायरीचे संपादक सय्यद अकबर, महाराष्ट्र टाईम्सचे कुणाल लोंढे, दै.पुण्यनगरीचे साहिल रेळेकर, टीव्ही ९ चे हर्षल भदाणे, रायगड संदेशचे संपादक विशाल सावंत, रायगड टुडेचे संपादक क्षितिज कडू, प्रवीण मोहोकर, असीम शेख, साबिर शेख, इरफान शेख, विकास पाटील, अनिल राय, लक्ष्मण ठाकूर, अ‍ॅड शुभांगी लाड, सुधीर पाटील, विक्रम येलवे, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# शासकीय विविध दाखले शिबिरांचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील विद्यार्थी व नागरिकांसाठी खारघर, सुकापूर, कळंबोली, आजिवली, कामोठे व गव्हाण या सहा ठिकाणी शासकीय विविध दाखले वाटप शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

रेशनकार्ड, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, डोमासाईल, आधारकार्ड, वय व अधिवास, अशा विविध शासकीय दाखल्यांसाठी विद्यार्थी व नागरिकांना पनवेल तहसील कार्यालयात फेऱ्या माराव्या लागतात, अशा परिस्थितीत वेळ आणि आर्थिक भुर्दंड पडत असतो, त्यामुळे नागरिकांचा हा त्रास वाचविण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पन-वेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी व नगरसेवक बबन मुकादम यांनी पनवेलचे तहसिलदार विजय तळकर यांची भेट घेऊन शासकीय दाखले वाटप शिबीर आयोजित करण्याची मागणी केली होती.

त्या मागणीच्या अनुषंगाने या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. कोरोनाच्या काळात अशा प्रकारचे शिबीर आयोजित झाले नाहीत, त्यामुळे विद्यार्थी व नागरिकांची गैरसोय झाली होती पण आता ती दूर झाली आहे,

त्यामुळे या शिबिराचा जास्तीत जास्त विद्यार्थी व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत तीचे मालक श्रीमती.ठकीबाई मणीलाल म्हात्रे, श्री.विमर्शन मणीलाल म्हात्रे, सौ.दिर्घा गौतम पाटील, सौ.रेखा विनोद म्हात्रे, संज्ञा विनोद म्हात्रे रा.पुनाडे, ता.उरण, जि.रायगड यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पुनाडे, ता.उरण, जि.रायगड**

| धारकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| श्रीमती.ठकीबाई मणीलाल म्हात्रे, श्री.विमर्शन मणीलाल म्हात्रे, सौ.दिर्घा गौतम पाटील, सौ.रेखा विनोद म्हात्रे, संज्ञा विनोद म्हात्रे | १३६ | २४१/अ | ०-२९-७०<br>पो.ख. ०-०५-६०<br>एकूण ०-३५-३० | ४.२५ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, गहाणखत, वहिवारंग, वहिवाट, किवकिवडा, हक्कहितसंबंध वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून सदरचा कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.१६/०९/२०२१
स्थळ : उरण

**सही/-**
**अ‍ॅड.योगेश नामदेव म्हात्रे**
**रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.८०९७१०८०६०/८०९७१०८०६०**



### जाहीर नोटीस

पाली येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.३९/२०२१
ने.ता.८/११/२०२१

१) श्री.गणेश शांताराम खंडागळे
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पो.वैतागवाडी, ता.सुधागड, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत नाडसुर
ता.सुधागड, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आजी कै.मसणी उर्फ काशिबाई बाळकृष्ण खंडागळे यांचा मृत्यू दि.१/६/१९८९ रोजी मुक्काम पोस्ट : वैतागवाडी, ता.सुधागड, जिल्हा : रायगड यांच्या राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या आजीच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पाली येथील मे.प्रथमवर्ग न्यायंदडाधिकारी सो. यांचे कोर्टात अर्ज केलेला आहे. अर्जदार यांच्या आजीचा मृत्यू वरील नमूद केलेल्या ठिकाणी झालेला आहे. त्याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल तसेच सदरहू अर्जास कोणाची हरकत असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून कायदेशीर हरकती नोंदविण्याच्या आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदीतत योग्य हरकती न आल्यास सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात येतील याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.२९/८/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पाली — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पाली


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## युसुफ मेहेरअली सेंटरच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन

### जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होण्याचे सेंटरकडून आवाहन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील 'सायमन गो बॅक' म्हणत सायमन कमिशन ला विरोध करणारे, 'चले जाव' आंदोलनाचे नेते तथा मुंबईचे पहिले सर्वात तरुण महापौर म्हणून ओळख असलेल्या युसूफ मेहेरअली यांच्या एकशे अठराव्या जयंतीनिमित्त पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागासह भारतातील आठ राज्यांत मागील सहा दशके शाश्वत ग्रामीण विकासाचे काम करणा-या युसुफ मेहेरअली सेंटरच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन पद्धतीने निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा लहान व मोठा अशा दोन गटांत घेतली जाणार आहे. इयत्ता ५ वी ते ८ वी लहान गटासाठी १) युसूफ मेहेरअली२) आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ३) साने गुरुजी या विषयांवर तर इयत्ता ९ वी ते १२ ह्या मोठ्या गटासाठी १) युसूफ मेहरअली आणि चलेजाव आंदोलन २) मिसाईल मॅन डॉक्टर ए.पी.जे.अब्दुल कलाम ३) पर्यावरण संवर्धनासाठी उपाय ह्या विषयांवर तीस ओळींत निबंध लिहून पाठवावे.

सदर स्पर्धेचे प्रवेश निशुल्क असून स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्या स्पर्धकांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे अनुक्रमे १५००/-, १०००/-, ५००/- अशी रोख रक्कम व सन्मानपत्र देण्यात येणार आहे तरी सर्व शैक्षणिक संस्था चालक वा शिक्षकांनी आपल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांना ह्या स्पर्धेत भाग घेण्यास प्रवृत्त करून सहभागी विध्यार्थ्याचे निबंध २८ सप्टेंबर २०२१ पूर्वी PDF फॉरमॅटमध्ये ऑनलाईन पद्धतीने गुगल लिंकद्वारे पाठविण्याचे आवाहन युसूफ मेहेरअली सेंटरचे प्रकल्प संचालक सुरेश रासम यांनी केले आहे.

स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी किंवा चौकशीसाठी ९९२०३२०५ ०८ /८००७१७०७८३/ ९० २९८०००६६/ ९४०४८०८ ८१२ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवा-हनही सुरेश रासम यांनी केले आहे.

# मिनीबस आली लवकरच डबघाईला

## प्रवाशांची त्रेधातिरपीट : शेडविना महिलांची गैरसोय

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

माथेरान मिनीबस सेवेचे नेहमीचेच रडगाणे सुरू झाले असून सातत्याने या गाडीच्या तांत्रिक बिघाडामुळे प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाची हमी असल्यामुळे केवळ स्थानिक मंडळीच या सेवेचा लाभ घेत असतात.परंतु या सेवेला नेहमीच ग्रहण लागलेले असते त्यामुळे प्रवाशांना नाईलाजाने खाजगी वाहनांचा आधार घेऊन अधिक पैसे मोजावे लागत आहेत.



दस्तुरी नाक्यावर असलेले शेड एमएमआरडीए ने पार्किंगचे सुशोभीकरण करताना बस स्टँडचे शेड काढले होते ते अद्यापही पुन्हा उभारलेले नसल्याने उन्हाळ्यामध्ये भर उन्हात तर पावसाळ्यात पाऊस अंगावर झेलत मिनीबसची वाट पहावी लागत आहे यामध्ये महिलांना, लहान मुलांना याचा मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. तर कर्जत माथेरान ह्या बसला नेरळ येथील खांडा येथे स्टॉप देण्यात यावा अशी स्थानिकांची मागणी तुर्तासतरी मान्य केली असली तरीसुद्धा खांडा भागात काही खाजगी वाहन चालक रस्त्याच्या कडेला अरुंद जागेत आपली वाहने हेतुपुरस्सर उभी करून ही बस खांड्यात येऊ नये यासाठी प्रयत्न करताना दिसतात.जेणेकरून खाजगी वाहन चालकांना व्यवसाय मिळू शकतो. यामुळे प्रसंगी बस चालक आणि काही माथेफिरू खाजगी वाहन चालक यांच्यात नेहमीच हमरीतुमरी होत असते याकामी तिथे सुध्दा पोलिसांनी लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे प्रवाशी वर्ग बोलत आहेत. कर्जत ते माथेरान दरम्यान धावत असणाऱ्या या बसेस अनेकदा कर्जत ते पनवेल असाही प्रवास करीत असतात त्यामुळे या ठिकाणी वेळेत बसेस उपलब्ध होत नाहीत. माथेरान करांनी चार दशकांपूर्वी नेरळ ते माथेरान घाटरस्ता श्रमदानातून तयार केल्यामुळे आज नेरळ, कर्जत भागातील अनेक कुटुंब पोट भरत आहेत परंतु नेहमीच या भागातील काही मंडळी हेतुपुरस्सर त्रास देण्याची भूमिका बजावत असतात. यासाठी पोलीस प्रशासनाने नेरळ खांडा भागात बसच्या वेळेस गस्त घालणे गरजेचे बनले आहे. शासनाने याबाबत लवकरच उत्तम दर्जाच्या बसेस या मार्गावर उपलब्ध करून घ्याव्यात जेणेकरून सर्वसामान्य लोकांना या सेवेचा पुरेपूर लाभ घेता येईल आणि परिवहन मंडळाच्या कर्जत आगाराच्या उत्पन्नात भर पडेल असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

# तोतया पोलिसाने घरातील दागिने केले लंपास

**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल** : तोतया पोलिसाने एका घरात जावून ८० हजाराची चोरी केली आहे तरी तुमचे घर तपासावे लागेल असे सांगून घरा-तील सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना तालुक्यातील जावळे गावाच्या हद्दीत घडली आहे.

चंदा म्हात्रे (४३) यांचे जावळे गावाजवळील उलवे सेक्टर २५ येथे घर आहे. त्या ठिकाणी एक अनोळखी इसम हा आला व त्याने आपण पोलीस असल्याची बतावणी करून त्यांना व त्यांच्या पतीला ८० हजाराची चोरी झालेली आहे तरी तुमचे घर तपासावे लागेल असे सांगून तुमच्याकडील पैसे व सोने दाखवा अशी धमकी दिली.

यावेळी त्यांनी त्यांच्या घरातील सोन्याचे दागिने जवळपास ५२ हजार ५०० रुपये किंमतीचे दाखविले असता सदर इसम दागिने घेवून पळून गेल्याने आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे.

# मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सोसायटीच्या पार्कींगमध्ये उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना पनवेल शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटीत घडली आहे.

अनिल पाटील (४२ रा.कनक सवेरा, प्लॉट नं.२, पनवेल) यांची ६ हजार रुपये किंमतीची हिरो होंडा कंपनीची काळ्या रंगाची त्यावर केशरी रंगाचे स्टीकर असलेली मोटार सायकल ही त्यांच्या मुलाने सोसायटीच्या पार्कींगमध्ये उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर मोटार सायकल चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत कब्जेदार सदरी नाव असलेल्या मिळकतीचे मालक / कब्जेदार १) अफजल हुसैन हसन रजा खान २) अनवर हुसेन करम हसेन खान ३) सगीर अहमद शेर अली खान यांच्याशी चर्चा करून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार आमचे अशिल करणार आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : चाळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १०८ | १ | ०.२०२०<br>पो.ख.०.०२८०<br>एकूण ०.२३.०० | २.८९ |

तरी वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कोणताही गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, विकसन, कारनामा, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा महसूली वाद असल्यास त्यांच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे माझे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून खात्री करून घ्यावी. उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर मिळाल्यास माझे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १६/०९/२०२१

**सही/-**
**ॲड.हेमंत अनंत पाटील**
**शॉप नं.२, प्लॉट नं.१८८/३,**
**कनक संस्कृती, कफ नगर, पनवेल,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

# गोवे येथील तरुणांनी जोपासला सारिपाटाचा खेळ

**दै.रायगड नगरी । विश्वास निकम**

**गोवे-कोलाड** : गणेश उत्सवामध्ये जागरण म्हणून परिचित असणारे सर्व खेळ हळूहळू लोप पावत असतांना गोवे येथील तरुणांनी आधुनिक काळात ही सारिपाटाचा खेळ जोपासला आहे. कौरव पांडवा पासून चालत आलेला सारिपाटाचा खेळ हा गणेश उत्सवा पासून दसऱ्या पर्यंत जागरण म्हणून बुद्धीचा वापर करुन खेळण्यात येणारा खेळ हा पुर्ण होण्यासाठी तीन ते साडेतीन तास लागतात.

पिढ्यान-पिढ्या पासून चालत असणारा सारिपाटाचा खेळ हा मोठया बुद्धीचा वापर करुन खेळला जातो. परंतु भावी तरुण पिढी या जुन्या खेळा पासून दूर होत असतांना दिसत आहेत. अशा परिस्थितीत गोवे गावातील या खेळात पारंगत असलेले जेष्ठ नागरिक रामा होनाजी गुजर यांच्या मार्गदर्शनाखाली हा खेळ जोपसला जात आहे.

रामा गुजर यांच्या मार्गदर्शना खाली तरुण वर्गातील लीलाधर दहिंबेकर, प्रशांत गुजर, चंद्रकांत पवार, निलेश दहिंबेकर, जयसिंग पवार, अजित दहिंबेकर, कल्पेश सुर्वे, आकाश दहिंबेकर, साहिल दहिंबेकर, सार्थक दहिंबेकर, हरिचंद्र गुजर, अरुण दहिंबेकर, हे तरुण सारिपाटाचा खेळ आपल्या बुद्धीचा वापर करुन जोपासत आहेत.



श्री.भाकरे साो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.विक्रम पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.११७२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२९/१०/२०२१

श्री.विनोद यशवंत कदम — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र एकर गुंठा | क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| २५३ | ६/क | ०.२१.०० | ०.२१.०० | १.५७ |
| १०७ | १५/अ | ०.१६.० | | |

कै.यशवंत दिनकर उर्फ दिनकराव कदम हे दि.२२/०४/१९९४ रोजी मु.रुम नं.५, कमल सय्यद बिल्डींग चर्च गेट माजिवाडा ठाणे, तसेच त्यांची पत्नी कै.शारदा यशवंत कदम हे दि.१९/०५/२०१७ मु.बी.४, पुजा कॉम्प्लेक्स, विजय नगर, कल्याण (पूर्व), डोंबिवली, ठाणे येथे मयत झाले. तसेच त्यांची आई कै.लक्ष्मी दिनकर उर्फ दिनकरराव कदम हे दि.११/०९/१९७७ रोजी मयत झाल्या असून त्यांस अर्जदार क्र.१. श्री.विनोद यशवंत कदम, अर्जदार क्र.२. श्री.अनिल यशवंत कदम, अर्जदार क्र.३. सौ.रेनुका राजेंद्र सुर्वे हे २ मुलगे व १ मुलगी असे ३ वारसदार आहेत.

अर्जदार यांनी कै.यशवंत दिनकर उर्फ दिनकरराव कदम यांच्या मृत्यूच्या पश्चात वारसदाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांच्या वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही.

आज दि.९/९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.गोडसे साहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.३ रे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११८६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/१०/२०२१

१) श्रीमती.नर्मदा शांताराम पाटील, वय : ६० वर्षे
२) श्रीमती.आशा निलकंठ म्हात्रे, वय : ५३ वर्षे
रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड
३) श्री.विजय शांताराम पाटील, वय : ५३ वर्षे
रा.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.शोभा सुनील पाटील, वय : ३८ वर्षे
रा.कंठवली, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
५) सौ.दिपीका दिपक पाटील, वय : ३७ वर्षे
रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड
६) सौ.वनिता गणेश घरत, वय : ३४ वर्षे
रा.सावरखार, पो.जेएनपीटी, ता.उरण, जि.रायगड
७) श्री.संतोष शांताराम पाटील, वय : ३३ वर्षे
८) श्री.अभिनंदन शांताराम पाटील, वय : २६ वर्षे
क्र.१, ७, ८ रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.शांताराम मुकूंद पाटील हे दि.२८/०५/२०२० रोजी टाटा मेमोरियल सेन्टर, खारघर, नवी मुंबई येथे मयत झाले आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**जमिनींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| न्हावे-३२३ | १ अ | ७२ | ०-०६-६ | ०.८१ |
| | १ अ | ८६ | ०-०४-० | ०.५२ |
| | १ अ | १५० | ०-०२-० | ०.४७ |
| | १ अ | ११६ | ०-३२-० | ०.७२ |
| | अ | ६७ | ०-१७-० | ०.९७ |

अर्जदार हे कै.शांताराम मुकूंद पाटील यांचे, कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.१५/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

श्री.भाकरे साो.कोर्ट

ॲड.निलम शिंदे, पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११५६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२९/१०/२०२१

कै.रामकृष्ण विठ्ठल पाटील मयतचे वारस
१) श्रीमती.सुनंदा रामकृष्ण पाटील
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.तेजस रामकृष्ण पाटील
वय : २७ वर्षे, धंदा : शेती
दोघेही रा.मु.शेडुंग, पो.अजिवली,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. रामकृष्ण विठ्ठल पाटील यांचे निधन दि.१६/०३/२०२१ रोजी मु.शेडुंग, पो.अजिवली, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले असून कै. रामकृष्ण विठ्ठल पाटील यांची आई कै.लक्ष्मीबाई विठ्ठल पाटील यांचे निधन दि.१५/०८/२००२ रोजी मु.शेडुंग, पो.अजिवली, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाल्याने अर्जदार ह्यांनी कै.रामकृष्ण विठ्ठल पाटील यांच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट नं.ब १०१, ''बि २-विंग'', पहिला मजला, बिल्डींग नं.२ ''कैलाश पार्क को.ओ.हौसिंग सोसायटी'', पनवेल, जि.रायगड, क्षेत्रफळ ७५० चौ.फूट.**
**सदर सदनिकेची एकूण किंमत रक्कम रु.५,४०,०००/-**
**(अक्षरी रुपये पाच लाख चाळीस हजार मात्र)**

वरील मिळकत ही कै.रामकृष्ण विठ्ठल पाटील यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्रीमती.उषा अरुण कुंभार वगैरे हे कै.रामकृष्ण विठ्ठल पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्याा आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.सुनंदा रामकृष्ण पाटील वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते कै.रामकृष्ण विठ्ठल पाटील यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.८/९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

राव साहेब

ॲड.अनिरुद्ध तुळसणकर, पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.६४२/२०२१
नि.नं.१०/ड
ने.ता.२२/०९/२०२१

१) इरफान इकबाल पटेल
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.२२८ बी, बंगाली मोहल्ला, कोळीवाडा,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड
२) सुफयान इकबाल पटेल
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.२२८ बी, बंगाली मोहल्ला, कोळीवाडा,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड
३) आरिफ इकबाल पटेल
वय : ४० वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.२२८ बी, बंगाली मोहल्ला, कोळीवाडा,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड
४) मोहम्मद आसिफ मो.इकबाल पटेल
वय : ३५ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.२२८ बी, बंगाली मोहल्ला, कोळीवाडा,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड
५) अकील इकबाल पटेल
वय : ३४ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.२२८ बी, बंगाली मोहल्ला, कोळीवाडा,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड
६) मुस्तफा इकबाल पटेल
वय : २९ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.२२८ बी, बंगाली मोहल्ला, कोळीवाडा,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड
७) नफिसा आरिफ दिवडे
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.२३४-२, मच्छि मार्केट रोड,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड
८) अणिसा बेगम शब्बीर अहमद पटेल
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.१०९, तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड
९) सुमैया दस्तगीर पटेल
वय : ३९ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.५१ (३), भटीला मोहल्ला, जामा मशिद जवळ,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड
१०) रईसा मोहम्मद झुबेर पटेल
वय : ३४ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.१४०-३, तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांचे वडील पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल हे मौजे : तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथे दि.१०/०६/२०१९ रोजी पैगंबरवासी झाले आहेत. पै.मिया अब्दुल लतिफ पटेल यांची पत्नी म्हणजेच पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल यांची आई अमिना अब्दुल लतिफ पटेल ह्या दि.२६/०५/२००८ रोजी मौजे : तळोजा येथे पैगंबरवासी झाल्या आहेत. तसेच पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल यांची पत्नी पै.साफिया इकबाल पटेल ह्या दि.१३/१०/२०२० रोजी मौजे : तळोजा येथे पैगंबरवासी झाल्या आहेत. पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल यांचे मृत्यूपश्चात त्यांना मुस्लीम कायद्यांतील तरतुदींनुसार अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. इरफान इकबाल पटेल वगैरे ह्यांनी पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल यांचे खुद्द मालकीच्या व त्यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

i) मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील ग्रामपंचायत तळोजा पाचनंद घर क्रं.२०५, क्षेत्र ७२.४+७२.४ चौ.मीटर अशा वर्णनाची आर.सी.सी. पक्के बांधकाम असलेली चार मजली इमारत.

ii) मौजे : हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग ३/१, क्षेत्र ७३.८० चौ.मी. अशा वर्णनाची बिनशेती मिळकत

iii) मौजे : हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग ३/२, क्षेत्र १७.६० आर.चौ.मी. अशा वर्णनाची बिनशेती मिळकत.

iv) मौजे : हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग ३/३, क्षेत्र ३२.८० आर.चौ.मी. अशा वर्णनाची बिनशेती मिळकत.

v) मौजे : हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग ४/१, क्षेत्र ०-३६-० हे.आर.पॉ. पैकी २० फुट क्षेत्राचा वहिवाटी रस्ता अशा वर्णनाची मिळकत

vi) मौजे : तळोजा पाचनंद, पापडीचा पाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथील गावठाण सिटी सर्व्हे नं.२५४ पैकी क्षेत्र ६०५ चौ.मी. व त्यावरील घर मिळकत आणि सिटी सर्व्हे नं.२६५ पैकी क्षेत्र २३१ चौ.मी. व त्यावरील घर मिळकत.

vii) मौजे : तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिटी सर्व्हे नं.५९४, ५९५ व ५९६ वर बांधण्यात आलेले ग्रामपंचायत घर क्र.२०५ ज्याचे एकूण बांधकामाचे क्षेत्र ५२५.०८८ चौ.फूट अशा वर्णनाचे बांधकाम असलेली इमारत.

viii) मौजे : बदलापूर, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील मालमत्ता / घर क्रं. २९०, क्षेत्र ४०७.८९ चौ.मीटर / फुट, अशा वर्णनाचे पक्के बांधकाम असलेली घर मिळकत.

ix) मौजे : बदलापूर, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील मालमत्ता / घर क्रं.३६०, क्षेत्र ७० चौ.मीटर / फुट अशा वर्णनाचे पक्के बांधकाम असलेली सामाईक घर मिळकतीतील निम्मा हिस्सा.

x) मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील १) सिटी सर्व्हे नंबर / प्लॉट नंबर ३४५, क्षेत्र ३७.६ चौ.मी. २) सिटी सर्व्हे नंबर / प्लॉट नं.३५०, क्षेत्र ०८.३ चौ.मी., ३) सिटी सर्व्हे नंबर / प्लॉट नंबर ३५१, क्षेत्र ३८.७ चौ.मी. अशा वर्णनाची गावठाणातील मोकळ्या प्लॉटची मिळकत. सदरहू मिळकत पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल, नुर अहमद अब्दुल लतिफ पटेल, नजीर अहमद अब्दुल लतिफ पटेल, म.जुबेर अब्दुल रऊफ पटेल यांनी मिळकतीचे पुर्वाश्रमीचे मालक रुकया अ.गफुर पटेल वगैरे ८ यांचेकडे दि.१८/०९/२०१३ रोजी खरेदीखताने कायम खरेदी घेतलेली आहे. सदरहू मिळकतीमध्ये पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल यांचा हिस्सा आहे.

xi) मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील ग्रामपंचायत तळोजा पाचनंद, मालमत्ता क्रं.२८८ क, क्षेत्र ११३.२ चौ.मीटर, अशा वर्णनाची पक्क्या विटांचे बांधकाम असलेली व कौलारु छपराची घर मिळकत.

xii) मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील ग्रामपंचायत तळोजा पाचनंद, मालमत्ता घर क्रं.२९२ अ, क्षेत्र १००० चौ.फूट, अशा वर्णनाची पक्क्या विटांचे बांधकाम असलेली व कौलारु छपराची घर मिळकत.

xiii) मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील ग्रामपंचायत तळोजा पाचनंद मालमत्ता क्रं.५११ अ, क्षेत्र १४५.५४+ ३६०.२२+ २४१.६४+४२.९४ चौ.मीटर, अशा वर्णनाची पक्क्या सिमेंट विटाची राईस मील मिळकत.

xiv) मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड येथील शॉप क्रं.०३, 'ए' विंग, तळमजला, सद्गुरु मिनी मार्केट, घर क्र.५१४, ३८३ अ आणि ३८३ ब, क्षेत्र २०९ चौ.फूट (कारपेट) अशा वर्णनाची मिळकत.

xv) मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील ग्रामपंचायत तळोजा पाचनंद मालमत्ता क्रं.१७२९, क्षेत्र १०७१+७४८+७७+४०+१५६ +१९५०+५४६ चौ.फूट, अशा वर्णनाची सिमेंट विटांचे बांधकाम असलेली मिळकत.

वर नमूद केल्याप्रमाणे पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल यांचे पुर्वगामी पै.अब्दुल लतिफ अहमद सो.पटेल यांच्या नावे असलेल्या जमीन मिळकतींमध्ये पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल यांचा अविभक्त हिस्सा आहे.

पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल यांचे मृत्यूपश्चात त्यांचे मालकीच्या मिळकतींमध्ये अर्जदार यांचा अविभक्त हिस्सा आहे.

वर शारबानू अनवर पटेल वगैरे हे पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट इरफान इकबाल पटेल वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर पै.इकबाल अब्दुल लतिफ पटेल यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.६/९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## ६१ वर्षांची परंपरा- दहा दिवसांच्या गणरायाचे दर्शन ; भक्त पुंडलिक देखाव्याने रंगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी आणि परिवाराच्यावतीने गेली ६१ वर्षे गणोशोत्सव साजरा केला जात आहे. दरवर्षी दहा दिवस असणाऱ्या या गणपती उत्सवात गणेश भक्तांना वेगवेगळ्या देखाव्याने आकर्षित करण्याचे आणि भक्तांकडून प्रशंसा मिळविण्याचे काम या उत्सवाने केले आहे. त्याचप्रमाणे या वर्षी भक्त पुंडलिक या देखाव्याचे रंगत आणलेली आहे. हजारो भाविकांचे श्रध्दास्थानी असलेले कोळी परिवार यांच्या श्री. गणपतीची सजावट राहुल भोईर, भुषण भोईर व विजय भोईर यांची आहे. तसेच पडदा पेंटीग रमेश डुकरे, निवेदक प्रथमेश सोमण तर विद्युत रोषणाई पंढरीनाथ शेलार, जनार्दन केणी यांनी साकारलेली आहे.



## रसिका तांबडे यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



सुकापूर येथील श्रीमती रसिका राजेंद्र तांबडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्यावर सुकापूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांचा दहावा विधी २२ सप्टेंबर रोजी गाढेश्वर येथे तर उत्तर कार्य दि. २५ सप्टेंबर २०२१, वार-शनिवार रोजी यांच्या राहत्या घरी सुकापूर येथे होणार आहे. त्यांच्या पछात मुलगा, मुलगी असा परिवार आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# एसटी कर्मचाऱ्यांना ना वेळेवर पगार ; ना वैद्यकीय बिले

## सण साजरे करावे लागतात पगारावीना ; गणेशोत्सवही साजरा केला साधेपणाने

**दै.रायगड नगरी । देवा पेरवी/प्रदीप मोकल**

गेली दोन वर्षे कोरोना संकटाने संपूर्ण जगावर राज्य केले आहे. याच कोरोना काळात एसटीची आर्थिक संकटात रुतलेली चाके आता काही प्रमाणात बाहेर येऊन पूर्ववत होत आलेली असताना कर्मचाऱ्यांना मात्र पगारा अभावी तसेच वैद्यकीय बिलांच्या अभावी जगायचे कसे? हा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे एसटी कर्मचाऱ्यांना वेतनाअभावी मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

कोरोना काळातील निर्बंधाचा फटका देशातील तसेच राज्यातील उद्योग धंद्यांना देखील मोठ्या प्रमाणात बसला आहे. त्याच प्रमाणे देशातील सर्वात मोठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असलेल्या एसटी महामंडळाला देखील कोरोनातील निर्बंधाचा मोठा आर्थिक फटका बसला आहे. प्रवासी वाहतूक व माल वाहतूक हेच उत्पन्नाचे प्रमुख मार्ग बंद असल्याने एसटीचा आधीच खोलात असलेला गाडा आणखी खोलात गेला असून त्यातच तीन पक्षांचा सरकार असलेल्या राज्य शासनाकडून निधी उपलब्धतेत विलंब होत असल्याचा मोठा परिणाम कर्मचाऱ्यांच्या पगारावर देखील झाला आहे. एकीकडे पगार वेळवर होत नसताना कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बील देखील रखडली असल्याने कर्मचाऱ्यांचा मनस्ताप आणखी वाढला. त्यातच सध्या सुरू असलेले विविध सण कसे साजरे करावे हाही प्रश्न एसटी कर्मचाऱ्यांपुढे आहे.

यापूर्वीही कोरोना काळात एसटी व्यवस्था संपूर्ण बंद असल्याने वेतनाचा प्रश्न गंभीर झाला होता. आता मात्र एसटीची गाडी पुन्हा एकदा रस्त्यावर धावू लागली असली तरी पुन्हा कर्मचाऱ्यांचे पगारा अभावी वांदे झाले आहेत. रायगड विभागातील



पेण, महाड, श्रीवर्धन, माणगांव, अलिबाग, मुरुड, कर्जत, रोहा या आठ आगारात दोन हजार २७१ कर्मचारी काम करत आहेत. यामध्ये ५०३ वाहक, ४९३ चालक असून १९ हे वर्ग दोनचे अधिकारी व ८०६ प्रशासकीय व कार्यशाळा कर्मचारी काम करत आहेत. या कर्मचाऱ्यांचेही वेळेत वेतन मिळेल का? याकडे लक्ष लागून राहिले आहे.

कोरोना काळात असलेल्या निर्बंधा मुळे एसटीची प्रवासी वाहतूक बंद होती. या काळात देखील कर्मचाऱ्यांना पगार बंदच होता. निर्बंध शिथिल झाल्यानंतर प्रवासी व मालवाहतूक कार्गो सेवा सुरु झाली. सुरुवातीला प्रवाशांचा प्रतिसाद देखील अल्प प्रमाणात होता. एसटीचा मुख्य प्रवासी असलेल्या खेडेगावातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी बराच कालावधी जावा लागला. यामुळे निर्बंध शिथील झाले असले तरी हवे तसे उत्पन्न वाढले नसल्याचा परिणाम कामगारांच्या पगारावर होत आहे. दर महिन्याच्या सात तारखेला होणारा पगार दोन महिन्यातून एकदा होऊ लागला.

एकीकडे कामगारांचे पगार वेळेवर होत नसताना कामगार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना मेडिकल सुविधाची बिले देखील वेळेत मिळत नसल्याने कामगार मेटाकुटीला आले आहेत. कोरोना काळात पगार बंद ; आता पगार वेळेवर नाही व त्यात स्वतःचे व कुटुंबातील सदस्यांचे आजारपण याच्या कडे देखील दुर्लक्ष होत आहे.

कोरोना बरोबर इतर आजारां मुळे घरातील पत्नी व मुलांचे आरोग्य बिघडले होते. महामंडळाने नेमून दिलेल्या डॉक्टर कडे औषध उपचार केला त्याची बिले देखील ऑफीस मध्ये जमा केली, मात्र अद्याप पर्यंत त्याची रक्कम जमा झाली नसल्याचे एका कर्मचाऱ्याने सांगितले.

सध्या विविध सण सुरू आहेत. गणेशोत्सवासारखा मुख्य सण असला तरी पगार नसल्याने आमच्या कुटुंबाला सर्व सण साधेपणाने साजरे करावे लागत आहे. पैशाची आवक बंद आहे, मात्र कुटुंबावरील खर्च तेवढाच करावा लागतो. असेही नाव न छापण्याच्या अटीवर एका एसटी कर्मचाऱ्याने आपली व्यथा मांडली.

> महामंडळा कडे असलेल्या निधीच्या उपलब्धते प्रमाणे कर्मचाऱ्यांचे पगार व वैद्यकीय बिले दिली जात आहेत.
>
> **: अनघा बारटक्के, विभाग नियंत्रक, रायगड**

## कोंकण विभागाचे सेवानिवृत्त महसूल आयुक्त शिवाजी दौंड यांचे दु:खद निधन

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

कोंकण विभागाचे सेवानिवृत्त महसूल आयुक्त शिवाजी दौंड यांचे आज वंजारवाडी ता. तासगाव, जि.सांगली या त्यांच्या राहत्या घरी हृदय विकाराने दु:खद निधन झाले.

दौंड यांनी सामान्य प्रशासन विभागाचे सचिव आणि विशेष चौकशी अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना, सचिव राज्य माहिती आयोग, मत्स्योद्योग महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, लघूउद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, खादी ग्रामोद्योगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अशा विविध पदावर काम केले होते. या शिवाय कोरोना काळात त्यांनी कोकण विभागासाठी विशेष कार्य केले आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नी शासनाच्या वतीने अहवाल तयार करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. प्रशासकीय कामात त्यांची चांगली पकड होती. लोकसंग्रहही अधिक होता. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल कोंकण भवन येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दु:ख व्यक्त केले आहे.

## माथेरान निवडणुकीचा श्रीगणेशा गणेशोत्सवापासून?

**दै.रायगड नगरी । माथेरान**

गणेश ही विद्येची देवता व संकटांचं निवारण करणारी देवता म्हणून प्रसिद्ध आहे. एखाद्या महत्कार्याच्या आरंभी ' श्री गणेशाय नमः ' म्हणून गणेशाची स्तुती व आराधना करण्याची प्रथा आहे. त्याचप्रमाणे अध्ययनाच्या आरंभीही गणेशाचा नामोच्चार करतात. हा देव सकळ विघ्नांचा हर्ता व मंगलमूर्ती असा मानला जात असल्यामुळे या देवाचे पूजन केले जाते ह्यावर्षीच्या शेवटी माथेरान नगरपालिकेच्या निवडणुका होऊ घातल्या असल्याने ह्यावर्षीच्या गणेशोत्सवास माथेरानमध्ये एक वेगळे महत्व प्राप्त झाले आहे अनेकांना गणपती पावल्याने त्यांचा गणेशोत्सव जोरात आहे तर काहीजण गणपतीला साकडे घालून आगामी काळासाठी प्रसन्न करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करताना दिसून येत आहेत.

नगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच सर्वत्र निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत पण अजून आरक्षण जाहीर झालेले नसल्याने अनेक इच्छुक वेट अँड वॉच च्या भूमिकेत दिसत आहेत असेच माथेरानचे काहीसे चित्र दिसून येत आहे इच्छुक उमेदवारांनी आतापासूनच गणेशाच्या कृपेने गाठीभेटी सुरू केल्या आहेत तर काहीजण ह्या निमित्ताने आ-पली ताकद व संघटन चाचपडून पहात असल्याचे दिसून येत आहे

माथेरान मध्ये शिवसेनेची एकहाती सत्ता आहे सतरा पैकी चौदा नगरसेवक व नगराध्यक्ष सेनेचा असल्याने सेनेने माथेरानमध्ये अनेक विकासकामांसाठी मा. मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्याकडून भरीव निधी आणून येथील रस्ते व प्रेक्षणीय स्थळे विकसित करण्यासाठी वापरून पुन्हा एकदा आपला दावा नगरपालिकेवर दाखविला आहे पक्ष संघटन अधिक मजबूत होत असताना सेनेच्या दहा नगरसेवकांनी भाजपा मध्ये प्रवेश करून सेनेला मोठा हादरा दिला होता , एकवेळ एकहाती पुन्हा सत्ता मिळविणार असा



दावा करणाऱ्या सेनेला हा मोठा धक्का असल्याने सर्व समीकरणे बदलणार आहेत कधी नव्हे ते ह्या वेळी भाजपा अधिक मजबूत पणे ह्या निवडणुकीत आपला दावा दाखल करणार असल्याने आतापासूनच चुरस सुरू झाल्याचे दिसत आहे भाजपने आपला माथेरानचा चेहरा अजून तरी समोर केला नसल्याने त्यांची भूमिका अजून तरी स्पष्ट नसली तरी वैयक्तिक गाठीभेटी घेत कामास सुरवात झाल्याचे चित्र मात्र दिसत आहे

राज्यात महायुतीची सत्ता असताना माथेरानमध्ये चित्र मात्र वेगळे आहे येथील सत्तेमध्ये सेना असली तरी कॉंग्रेस मात्र कट्टर विरोधक राहिला आहे सातत्याने राष्ट्रीय कॉंग्रेसने सत्ताधार्यांना विरोधच केलेला दिसून आला आहे व आगामी निवडणुकीमध्ये ऐकला चलो रे ची त्यांनी एक वर्षांपूर्वीच घोषणा केली असल्याने कॉंग्रेस वेगळी लढणार असल्याचे अजून पर्यंत तरी चित्र होते पण माथेरान भाजपा वर पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची करडी नजर असल्याने भविष्यात सत्तेसाठी कॉंग्रेस बरोबर हात मिळवणी केल्यास आश्चर्य वाटायला नको कारण सध्या सोशल मीडियावर सुरू असलेल्या शीतयुद्धाच्या ही युती नजरेस पडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

राष्ट्रवादी व शिवसेना एकत्र लढणार का हा येथील चर्चेचा विषय आहे अजून तरी स्थानिक पातळीवर असा कोणताही निर्णय झालेला नाही पण राज्यातील बड्या नेत्यांना युती हवी असल्याने हा फारमुला माथेरान मध्येही पहावयास मिळणार का असा प्रश्न येथील लोकांना पडला आहे, माथेरान राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष अजय सावंत यांना मानणारा एक मोठा वर्ग माथेरानमध्ये आहे त्यामुळे निवडणुकीमध्ये त्यांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याने ते काय निर्णय घेतात हे राजकारणातील जाणकारांच्या उलटसुलट चर्चा सुरू आहेत ह्यावेळी एक प्रभाग पध्दत असल्याने त्यांची भूमिका निर्णायक असणार आहे माथेरानमध्ये राष्ट्रवादीला मानणारा एक मोठा वर्ग आहे पण त्यासाठी कार्यकर्त्यांची एक मोठी फळी आतापासूनच उभारणे गरजेचे आहे.

ह्यावेळची माथेरान पालिकेची निवडणूक चुरशीची होणार असल्याचे आतापासूनच दिसू लागले आहे कॉंग्रेसचे शहर अध्यक्ष मनोज खेडकर यांचा सुसंस्कृत चेहरा,भाजपा मध्ये सेनेतुन गेलेली कार्यकर्त्यांची मोठी फळी ज्यांना अनेक वर्षाचा निवडणुकांचा अनुभव आहे ते ह्यावेळी मोठे आव्हान उभे करणार हे निश्चित आहे पण शिवसेनेचे शहराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांचा अनुभव ,गटनेते प्रसाद सावंत यांनी लोकप्रियता आणि अनुभवी नेते अजय सावंत यांची कसोटी पाहणारी ही निवडणूक ठरणार असल्याने ह्या वर्षीच्या गणेशोत्सवास एक वेगळे महत्व प्राप्त झाले आहे त्यामुळे गणपती कोणास पावणार हे आगामी काळच ठरवणार आहे.

## रायगड पोलीस दल राज्यातील बेस्ट पोलीस युनिट अवार्ड विजेता

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यात पोलीस घटकांची कार्यक्षमता आणि कामगिरी वाढविणे, दिलेल्या मर्यादेमध्ये उत्कृष्ट पध्दतीने काम करणे, तसेच गुन्हेगारीला प्रतिबंध आणि गुन्ह्याचा तपास, त्याचप्रमाणे कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या संबंधित पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना प्रोत्साहीत करणे इत्यादी हेतू साध्य करण्यासाठी सर्वोत्कृष्ट पोलीस घटक पुरस्कार प्रदान करण्याची बाब महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक कार्यालयाच्या विचाराधीन होती.

या पार्श्वभूमीवर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून करण्यात आलेल्या निवड प्रक्रियेतून रायगड जिल्हा पो-लीस दलाची बेस्ट पोलीस युनिट अवॉर्ड (Best Police Unit Award) साठी निवड करण्यात आली आहे.

कामाच्या मूल्यांकनाचे निकष सकारात्मक, नकारात्मक मापदंड (झरीराशींशी) इत्यादीच्या अनुषंगाने घटकातील पूर्ण वर्षात (जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२०) दाखल गुन्ह्यांची माहिती विचारात घेऊन वार्षिक गुन्हेगारीच्या आधारावर तंतोतंत श्रेणी तयार न करता कॅटेगरी-वार्षिक आयपीसी गुन्हे ६ हजार पेक्षा कमी असलेले जिल्हे/ आयुक्तालये, कॅटेगरी इ- वार्षिक आयपीसी गुन्हे ६ हजार पेक्षा जास्त असलेले जिल्हे/ आयुक्तालये आणि कॅटेगरी उ- पो-लीस आयुक्तालय बृहन्मुंबई यांच्या अधिपत्याखालील सर्व घटक अशा तीन श्रेणीमध्ये घटकांची विभागणी करण्यात आली होती.





यापैकी कॅटेगिरी - मधून रायगड पोलीस दलाची बेस्ट पोलीस युनिट अवॉर्ड साठी निवड करण्यात आली आहे. याबाबत अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) राजेन्द्र सिंह यांच्या स्वाक्षरीने आदेश नुकतेच निर्गमित करण्यात आले आहेत. या निवडीबद्दल पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ व संपूर्ण रायगड पोलीस दलाचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## जेएनपीटी विभागातील वाहतुकीला शिस्त आणणार : निरज चौधरी

**दै.रायगड नगरी । उरण**

वाहतूक कोंडीच्या समस्येचे आगार म्हणून ओळख असलेल्या जेएनपीटी बंदरातील वाहतूक व्यवस्थेला कठोर निर्णय घेऊन शिस्त लावणार असा निश्चय न्हावाशेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक निरज चौधरी यांनी केला आहे.त्यामुळे जेएनपीटी बंदर विभागातील बेशिस्त वाहन चालकांना आता चाप बसणार आहे.

जेएनपीटी बंदर त्याच्या अंतर्गत असणाऱ्या अन्य तीन बंदरामुळे जेएनपीटी विभागात मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते.या बंदरामध्ये व आसपासच्या गोदामांमध्ये येणाऱ्या वाहनांच्या वाहतुकीला शिस्त नसल्याने वाहन चालक हि अवजड वाहने बेशिस्तपणे रस्त्याच्या बाजूला व अन्य ठिकाणी उभी करण्यात येत आहेत.

त्यामुळे रात्रीच्या अंधारात या वाहनावर आदळून अनेक दुचाकी स्वारांना नाहक प्राण गमवावे लागले आहे.त्यातच या बेशिस्त वाहनांमुळे जेएनपीटी विभागात अनेक ठिकानी नाहक वाहतूक कोंडी होत असल्याने जनतेला त्रास सहन करावा लागत आहे. त्यासाठी बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई सुरू केली असल्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक निरज चौधरी यांनी सांगितले.

जेएनपीटी बंदर विभागातील बेदरकार वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत असतात. त्यांनाही पायबंद घालण्यासाठी कठोर उपयाययोजना करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक निरज चौधरी यांनी स्पष्ट केले.जेएनपीटी बंदर विभागातील रस्त्यांवर उभ्या राहणाऱ्या वाहनांना नविन वाहनतळ निर्माण करण्याची गरज असल्याने त्याबाबत जेएनपीटीच्या संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करणार असल्याचे नीरज चौधरी यांनी सांगितले.एकंदरीत आता जेएनपीटी विभागातील वाहतूक समस्येवर नियंत्रण येणार असल्याने जनतेत समाधान व्यक्त होत आहे.



संत रोहिदास नगर माथेरान येथील श्री. व सौ. रंजना वसंत बोंबे आणि संजय बोंबे यांच्या घरी विराजमान झालेली आकर्षक गणरायाची प्रसन्न मूर्ती



शेतात नांगर चालतो तेव्हा देश चालतो. अशाप्रकारे उत्तम सजावट केली आहे माथेरान मधील हेमंत हनुमंत पवार, संत रोहिदास नगर यांच्या घरी



मसळे कुंभारवाडा येथील गौरी गणपती महेंद्रकुमार विषणू ढवळे यांचे घरातील नवसाला पावणारा गणपती